वृत्तपत्राचे नांव :- केसरी
वृत्तपत्र प्रकाशन ठिकाण :- पुणे
पृष्ठ क्र. :- 5
दिनांक :- 30/8/11
कात्रण नंबर:

# ...तर वेदविद्या नष्ट होण्याची भीती

पुणे : समाजाला दिशा देण्याचे कार्य करणाऱ्या वेदविद्या आणि वेदसंस्कृती ही आजपर्यंत प्रतिकुल स्थितीत टिकून राहिली होती, मात्र आज वेदविद्येविषयी निर्माण होत असलेली अनास्था पाहता पुढील पन्नास वर्षांत वेदविद्या नष्ट होईल काय, अशी भीती ज्येष्ठ इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केली.

वेदशास्त्रोत्तेजक सभेचा सोमवारी १३७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पुरंदरे बोलत होते. त्या वेळी 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि वेदशास्त्रोत्तेजक सभेचे अध्यक्ष दीपक टिळक, कार्यवाह प्रभाकर गोखले, वेदपंडित शंकरशास्त्री दामले, वेदपंडित बंडोपंत पुजारी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात दरवर्षीप्रमाणे बंडोपंत पुजारी आणि शंकरशास्त्री दामले या दोन वेदपंडितांचा सभेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

पुरंदरे पुढे म्हणाले, की मला वेदशास्त्रामध्ये तितकेसे काम करता आले नाही. मात्र वेदविद्या आणि वेदसंस्कृतीविषयी मला खूप प्रेम असल्याने भविष्यातील वेदविद्येचे भवितव्य काय होणार, याची सतत चिंता सतावते. इस्लामी राज्यकर्त्यांकडून वारंवार वैदिक ज्ञानकेंद्रे उद्ध्वस्त करताना देखील गागाभट्टासारख्या विद्वानांनी ती टिकवून ठेवली आहे. आज मात्र वेदविद्येसाठी आपले जीवन व्यतित करणाऱ्या दोन विद्वानांचा सत्कार आहे, याची कुणालाही दखल असलेली दिसत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. वेदविद्येसाठी आपण स्वयंसेवक म्हणूनसुद्धा कार्य करायला तयार असून, वेदविद्या वाढली पाहिजे, त्यासाठी आपणाला इतिहास संशोधनामध्ये वेदातील पुरावे उपलब्ध करून देण्यासाठी मदत करावी, अशी इच्छा पुरंदरे यांनी या वेळी व्यक्त केली.



वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या १३७ व्या वर्धापनदिनानिमित्त वेदपंडित बंडोपंत पुजारी आणि शंकरशास्त्री दामले यांचा सत्कार बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी सभेचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक उपस्थित होते.

वेदांसाठी कार्य करणाऱ्या दामले आणि पुजारी या दोन पंडितांचा सत्कार करण्याची संधी मिळाली, हे सभेचे भाग्य समजत असून, बदलत्या काळातील वेदविद्येविषयी अनास्था वाढत चालली आहे, हे खरे आहे, त्याचबरोबर वेदविद्येसाठी आजपर्यंत निष्काम भावनेने कार्य करणारे कार्यकर्ते पुढे मिळतील की नाही, ही शंका आहे, त्यामुळे वेदविद्येच्या वाढीसाठी आर्थिक तरतुदींबरोबरच इतर आवश्यक त्या उपाययोजना करण्यास सभा कटिबद्ध राहील. त्याचबरोबर आजपर्यंत वेदविद्येचा अभ्यास करून परीक्षा देणारे विद्यार्थी पूर्वी एका केंद्रावर घेण्याइतपत होते, पण आज एकूण आठशे विद्यार्थी या परीक्षेसाठी बसतात. त्यामुळे चार केंद्रांचे संस्थेला नियोजन करावे लागते, ही आशादायी बाब आहे, असे डॉ. टिळक यांनी सांगितले. वेद हे ब्रम्हांड निर्मितीचे तत्त्वज्ञान असून, त्यामध्ये असलेल्या ज्ञानाचा परकीय अभ्यास करून आजच्या तंत्रज्ञानाचा विकास करीत आहे. त्याचबरोबर स्वकीय वेदांपासून कसे पराङ्मुख होतील यासाठी आवश्यक त्या शक्कली लढवित असून, आंग्ल शिक्षणाचा अवास्तव प्रचार करीत आहेत. वेदशास्त्रासाठी कार्य करणाऱ्या संस्थेकडून माझ्या कार्याचा गौरव करण्यात आला, हे माझे भाग्य समजतो, अशा शब्दात पुजारी यांनी सत्काराला उत्तर दिले. तर बंडोपंत पुजारी म्हणाले, की वैदिक शिक्षण घेणाऱ्या पाल्ल्यांना वधू मिळण्याइतपत बिकट परिस्थिती होती, तरीही वेदविद्या तुटपुंज्या दक्षिणेवर सुद्धा जोपासली. मात्र याच चिंतेने पाल्ल्यांना वैदिक विद्येऐवजी पालक आंग्लविद्या देताना दिसत आहेत. त्यामुळे वेदविद्येचे अलीकडील काळातील भवितव्य लक्षात घेऊनच वेदशास्त्रोत्तेजक सभेची स्थापना करण्यात आली. या संस्थेकडून आपल्याला पारितोषिक मिळाल्याने खूप आनंद झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

६०५
16-9-4